सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १७७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १९ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## महाराष्ट्र आणि मुंबई देवेंद्र फडणवीसांमुळे जगाच्या नकाशावर

### अमेरिकन राजदूत सर्जिओ गोर यांच्याकडून मुख्यमंत्र्यांचे तोंडभरून कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जिओ गोर यांनी जाहीरपणे कौतुक केले आहे. आजघडीला महाराष्ट्र २ कारणांमुळे जगाच्या नकाशावर आहे. एक म्हणजे मुंबई आणि दुसरे म्हणजे तुमचे विलक्षण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अशा शब्दांत गोर यांनी फडणवीस यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले. जगभर फिरलो असून अनेक नेत्यांना भेटलो; मात्र फडणवीस हे गतिमान, प्रचंड ऊर्जा असलेले आणि आपल्या कामाबद्दल आस्था असलेले नेते असल्याचेही त्यांनी नमूद केले.

ही प्रशंसा केवळ राजकीय नेत्याकडून किंवा उद्योगविश्वातील व्यक्तीकडून झालेली नसून, भारतातील अमेरिकेचे अधिकृत प्रतिनिधी असलेल्या राजदूतांकडून झाल्याने तिची राजकीय आणि राजनैतिक चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे अमेरिका-महाराष्ट्र आर्थिक आणि आरोग्य क्षेत्रातील सहकार्याच्या कार्यक्रमात गोर यांनी फडणवीस यांचे हे कौतुक केले.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांसाठी जोरदार टाळ्या वाजवा

मुंबईतील 'मेडिसिटी' प्रकल्पासाठी महाराष्ट्र सरकार आणि अमेरिकेतील प्रसिद्ध क्लिव्हलँड क्लिनिक यांच्यातील सहकार्याच्या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम झाला. यावेळी अमेरिका-भारत द्विपक्षीय सहकार्य, महाराष्ट्रातील गुंतवणुकीच्या संधी आणि आरोग्य क्षेत्रातील भविष्यातील सहकार्यावर चर्चा झाली. यावेळी बोलताना सर्जिओ गोर यांनी फडणवीस यांचा उल्लेख आपला मित्र आणि सन्माननीय मुख्यमंत्री असा केला. ते म्हणाले की, आपण जगभर प्रवास केला असून अनेक नेत्यांना भेटलो आहे. महाराष्ट्राकडे गतिमान, प्रचंड ऊर्जा असलेला आणि आपल्या कामाबद्दल आस्था असलेला नेता आहे. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्राच्या जागतिक ओळखीचा उल्लेख करत मुंबईसोबतच फडणवीस यांचे नाव घेतले आणि उपस्थितांना त्यांच्यासाठी जोरदार टाळ्या वाजवण्याचे आवाहन केले. राजदूतांच्या या वक्तव्याचा व्हिडिओ आणि त्यातील फडणवीस यांच्या कौतुकाचा भाग समाजमाध्यमांवर चर्चेचा विषय ठरला आहे.



अमेरिकेच्या राजदूतांनी महाराष्ट्राची जागतिक ओळख सांगताना मुंबईसोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेतल्याने हे वक्तव्य विशेष चर्चेत आले आहे. एका बाजूला महाराष्ट्राची आर्थिक राजधानी म्हणून मुंबईचे जागतिक महत्त्व आहे, तर दुसऱ्या बाजूला राज्यातील मोठ्या गुंतवणूक आणि पायाभूत प्रकल्पांना पुढे नेण्यासाठी राज्य सरकारच्या प्रयत्नांचा उल्लेख होत आहे.

मेडिसिटीसारख्या प्रकल्पांमधून महाराष्ट्राला जागतिक आरोग्यसेवा, संशोधन आणि नवोपक्रमाच्या नकाशावर आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. अशा पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या राजदूतांकडून मुख्यमंत्र्यांचे झालेले कौतुक हे सध्या महाराष्ट्राच्या राजकीय आणि आर्थिक वर्तुळातील चर्चेचा केंद्रबिंदू ठरले आहे. मुख्यमंत्र्यांनीही या भेटीवर समाधान व्यक्त करत भारत-अमेरिका संबंध अधिक दृढ करण्यावर आणि जास्तीत जास्त थेट गुंतवणूक महाराष्ट्रात आणण्यावर भर दिल्याचे स्पष्ट केले.

## केंद्रात आणखी एका कॅबिनेटसाठी शिंदे गटाची फिल्डिंग

### केंद्रीय मंत्रिमंडळात मोठ्या फेरबदलाचे संकेत, दोन डझनाहून अधिक मंत्री बदलणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नवी दिल्ली** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारमध्ये मोठ्या मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चेला पुन्हा वेग आला आहे. ऑगस्टमध्येच केंद्रीय मंत्रिमंडळात बदल होण्याची शक्यता असल्याचे संकेत गेल्या काही आठवड्यांपासून मिळत आहेत. मात्र, फेरबदलाची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. या पार्श्वभूमीवर काही मंत्र्यांची खाती बदलली जाऊ शकतात, काहींच्या जबाबदाऱ्या वाढवल्या जाऊ शकतात, तर काही नव्या चेहऱ्यांना केंद्रात संधी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या संभाव्य फेरबदलात महाराष्ट्राच्या राजकारणालाही विशेष महत्त्व मिळू शकते. विशेषतः एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने लोकसभेतील १३ खासदारांची ताकद दाखवल्यानंतर केंद्रातील मंत्रिपदांसाठी आपला दावा मजबूत केला आहे. शिंदे यांच्या पक्षाला आणखी मंत्रिपदे मिळावीत, यासाठी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाशी चर्चा झाल्याचे वृत्त यापूर्वी समोर आले आहे.

### शिंदेंची ताकद ७ वरून १३ खासदारांवर

महाराष्ट्रासाठी या फेरबदलातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा केंद्रातील दावा. जूनमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ६ लोकसभा खासदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत दाखल झाले. त्यानंतर शिंदे यांच्या पक्षाची लोकसभेतील संख्या ७ वरून १३ झाली, तर उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडे ३ खासदार उरले.

**ऑगस्टमध्ये फेरबदल होण्याची शक्यता** - केंद्रीय मंत्रिमंडळातील फेरबदलाची चर्चा नवी नाही. मात्र, जुलैच्या अखेरीस केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी पंतप्रधान मोदी १५ ऑगस्टनंतर मंत्रिमंडळ फेरबदलाबाबत निर्णय घेऊ शकतात, असे म्हटले होते. काही मंत्री मंत्रिमंडळात येतील, तर काही बाहेर जातील, असेही त्यांनी संकेत दिले होते.त्यामुळे आता ऑगस्टच्या उत्तरार्धात केंद्रातील संभाव्य बदलांकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. मात्र, नेमके किती मंत्री बदलले जातील किंवा कोणत्या मंत्र्यांची खाती बदलली जातील, याबाबत सध्या अधिकृत माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे २ डझनपेक्षा अधिक मंत्र्यांच्या बदलाची चर्चा ही सध्या सूत्रांवर आधारित राजकीय शक्यता म्हणूनच पाहावी लागणार आहे.

या घडामोडीला शिंदे गटाने 'ऑपरेशन टायगर'चे यश म्हणून मांडले. या सहा खासदारांमध्ये संजय जाधव, संजय देशमुख, संजय दिना पाटील, नवनिर्वाचित? नागेश पाटील आष्टिकर, ओमप्रकाश राजेनिंबाळकर आणि भाऊसाहेब वाकचौरे यांचा समावेश आहे. या राजकीय घडामोडीमुळे महाराष्ट्रातील महायुतीच्या राजकारणात शिंदे गटाची संसदेतली ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. त्यामुळे आता केंद्रातील मंत्रिपदांच्या वाटपात या वाढलेल्या संख्येचा फायदा मिळावा, अशी अपेक्षा शिंदे गटाकडून व्यक्त होत आहे.

## धिरजचा श्वास थांबला, पण अवयवदानातून अनेकांचे श्वास सुरू राहणार

### रेडीएन्ट हॉस्पिटल ते नागपूर ग्रीन कॉरिडॉरसमाजासमोर माणुसकीचा आदर्श







### मूत्रपिंड आणि यकृत इतरांना नवीन जीवन देणार

रेडिएंट हॉस्पिटलचे डॉ, सिकंदर अडवाणी आणि डॉ. हर्षाली ललकारिया यांनी अवयवदान प्रक्रियेसंदर्भात नागपूर आणि संबंधित तज्ज्ञ डॉक्टरांशी तात्काळ संपर्क साधला. धीरजच्या मूत्रपिड आणि यकृत प्रत्यारोपणाची प्रक्रिया रात्रीच सुरू करण्यात आली सर्व चाचण्या पूर्ण झाल्यानंतर आज मूत्रपिंड आणि यकृत एका कुटुंबाच्या जीवनात एक नवी पहाट आणू शकणार आत कोणतीही शंका नाही.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**
एका आठवड्यापूर्वी, आपल्या मित्रांसोबत केदारनाथ आणि बद्रीनाथला भेट देऊन आनंदाने घरी परतलेल्या ३० वर्षीय धीरज संतोष कलावतेला कदाचित कल्पनाही नव्हती की हा त्याचा शेवटचा प्रवास ठरेल. तीर्थयात्रेवरून परतत असताना झालेल्या एका भीषण रस्ते अपघातात गंभीर जखमी झालेल्या धीरजने मंगळवार, १८ ऑगस्ट रोजी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. पण त्याच्या मृत्यूनंतरही, धीरजचे जीवन इतरांच्या शरीरात श्वासाच्या रूपात जिवंत राहील. आपल्या सर्वात प्रिय सदस्याला गमावण्याच्या असह्य दुःखात, त्याच्या कुटुंबीयांनी धीरजचे अवयव दान करण्याचा धाडसी निर्णय घेऊन माणुसकीचा एक अनोखा आदर्श घालून दिला आहे.

### माणुसकी, संवेदनशीलता आणि त्यागाचे उदाहरण

धीरज आता त्याच्या कुटुंबासोबत नसेल, त्याचा आवाज आता ऐकू येणार नाही, तो आता घरातील जबाबदाऱ्या सांभाळू शकणार नाही आणि तो पुन्हा कधीही मित्रांसोबत प्रवास करूशकणार नाही. पण त्याचे अवयवएका अनोळखी व्यक्तीच्या शरीरात धडधडत राहतील, एका प्रिय व्यक्तीला - कुटुंबात परत आणतील आणि एका पालकाच्या मनात आशा परत - आणतील. जरी एका अपघातात धीरजचे आयुष्य अकाली संपले असले, - तरी त्याचे अवयव अनेक जीवनांना पुढे जाण्याची संधी देतील. कलावते कुटुंबाने ज्या धैर्यानेहानिर्णयघेतला आहे, तोनिःसंशयपणे समाजासाठीएक मोठा आदर्श आहे. एखादी व्यक्ती मरण पावू शकते, पण तिची चांगली कृत्ये तिला कायमजिवंत ठेवतात. धीरजसुद्धा आता त्याच्याशेवटच्याश्वासानंतर जिवंत राहील, दुसऱ्या कुणाचा तरी श्वास बनून... !

धीरज संतोष कलावते (३०, चांदूररेल्वे) आपल्या मित्रांसोबत केदारनाथ आणि बद्रीनाथला गेला होता. १२ ऑगस्ट रोजी, हेपाचतरुणकारनेघरी परतयेतहोते. दरम्यान, तळेगाव-चांदूर रेल्वे मार्गावरील शेडुरजना (खुर्द) गावाजवळ त्यांच्या कारचा भीषण अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की, एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर धीरजच्या डोक्याला आणि छातीला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर, धीरजला उपचारासाठी अमरावती येथील रिम्स या खाजगी रुग्णालयात गंभीर अवस्थेत दाखल करण्यातआले. त्याच्यावर डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू होते. तथापि, त्याच्या प्रकृतीत अपेक्षेप्रमाणे सुधारणा झाली नाही. सतत उपचार आणि औषधोपचार करूनही त्याची प्रकृती गंभीरच राहिली. कुटुंबीयांच्या विनंतीनुसार, सुमारे दोन दिवसांपूर्वी धीरजला रेडियंट रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथेही डॉक्टरांच्या पथकाने त्याला वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. धीरजला आयसीयूमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले होते, परंतु त्याची प्रकृती गंभीरच राहिली. मंगळवार, १८ ऑगस्ट रोजी, डॉक्टरांनी धीरजची प्रकृती गंभीर असल्याचे आणि त्याच्या बरे होण्याची शक्यता खूपच कमी असल्याचे कुटुंबाला कळवले. या बातमीने कुटुंब दुःखाच्या गर्तेत बुडाले. काही दिवसांपूर्वीच तीर्थयात्रेवरून सुखरूप परत येईल अशी आशा असलेला मुलगा, भाऊ आणि कुटुंबाचा आधार गमावण्याचाविचार असह्य होता. पणयाकठीण आणि भावनिक परिस्थितीत, कलावते कुटुंबाने एक असा निर्णय घेतला ज्यामुळे धीरजच्या आयुष्याला एक नवीन अर्थ प्राप्त झाला. जड अंतःकरणाने, कुटुंबाने धीरजच्या अवयव दानास संमतीदिली. कुटुंबानेठरवले की, जरी धीरज आता त्यांच्यासोबत राहू शकत नसला तरी, त्याचे अवयव गरजू व्यक्तीला नवीन जीवन देऊ शकतील. रुग्णालयातील डॉक्टरांनीही कुटुंबाच्या या निर्णयाचे मानवतेसाठी उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून कौतुक केले.

## जात जिंकली, प्रेम हारलं!

### घरच्यांच्या विरोधाला कंटाळून तरुण-तरुणीचे टोकाचे पाऊल

## तलावात आढळले मृतदेह




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९वाशिम** - प्रेम ना वय बघतं, ना पैसा, ना धर्म ना जात, बस ते बघतं फक्त मन. वाशिममधील २४ वर्षीय महादेव आणि २१ वर्षीय निकिताचंही तसेच होतं. पाण्याप्रमाणे निख्खळ प्रेम. त्या दोघांना लग्न करायचं होतं, सात जन्म सोबत राहायचं होतं. पण या दोघांची प्रेमाला यश मिळालं नाही. त्यांच्या घराच्यांना दोघांचं लग्न मान्य नव्हतं, त्याचं कारण, होतं दोघांची जात.

आपण आधुनिक जगात जगत असलो तरी लोकांच्या मनातील जात ही जात नाही. अजूनही खोट्या प्रतिष्ठेतेसाठी प्रेमविवाहला विरोध होतोय. घरच्यांचा विरोध होत असल्यानं महादेव आणि निकितानं टोकाचा निर्णय घेत वाशिमच्या मालेगाव तालुक्यातील मोर्णा तलावात उडी घेत आपलं जीवन संपवलं. याबाबतची माहिती पोलिसांनी दिलीय.

मालेगाव तालुक्यातल्या गोकसावंगी गावातील २४ वर्षीय युवक महादेव गजानन आणि २१ वर्षीय निकीता संतोष हे दोघेही १४ ऑगस्टपासून बेपत्ता होते. याप्रकरणी त्यांच्या पालकांनी मालेगाव पोलीस स्टेशनमध्ये (मिसिंगची) हरवल्याची तक्रारही दिली होती. मात्र काल या दोघांचेही मृतदेह गावाजवळच असलेल्या मोर्णा तलावात आढळून आले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या दोघांचे प्रेमसंबंध होते. लग्न करण्यासंदर्भात त्यांनी घरच्यांना माहिती दिली होती.

मात्र दोघेही वेगवेगळ्या जातीतील असल्यानं त्यांच्या घरच्यांचा या आंतरजातीय विवाहाला विरोध होता. घरच्यांना अनेकवेळा समजून सांगूनही ते लग्नाला तयार होत नसल्यानं ते नैराश्यात गेले होते. या दोघांनीही आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला. ते दोघेही मोर्णा तलावाजवळ आले आणि तलावात उडी घेत जीवन संपवलं. बुधवारी मासेमारी करण्यासाठी काही जण गेले होते, तेव्हा त्यांना दोन्ही मृतदेह एकाच ठिकाणी आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी दोन्ही मृतदेह तलावच्या बाहेर काढून पोस्ट मॉर्टमसाठी रुग्णालयात पाठवले. पोलीस याप्रकरणी पुढील तपास करत आहेत.

## वर्धेत ग्रामसभेत दोन गटामध्ये तुंबळ हाणामारी

### गावकऱ्यांनी एकमेकांना धूधू धुतलं...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९वर्धा-** वर्धामध्ये ग्रामसभेत राडा झाला. यावेळी दोन गटात तुंबळ हाणामारी झाली. ग्रामसभा सुरू असतानाच दोन गट आमनेसामने आले आणि त्यांनी एकमेकांना धुधु धूतलं. या हाणामारीचा व्हिडीओ समोर आला असून तो व्हायरल होत आहे. या प्रकरणी दोन्ही गटाविरोधात हिंगणघाट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे वर्धामध्ये एकच खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, वर्ध्याच्या हिंगणघाट पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या नांदगाव ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेदरम्यान राडा झाला. ग्रामसभेत एका नागरिकाने प्रश्न उपस्थित केल्यानंतर वादाला सुरुवात झाल्याची माहिती आहे. पाहता पाहता या वादाचे रूपांतर दोन गटांतील हाणामारीत झाले. ग्रामसभा सुरू असतानाच सभागृहात दोन्ही गटांमध्ये जोरदार मारामारी झाली. ग्रामपंचायत सभागृहाबाहेरही ग्रामसभेला उपस्थित नागरिकांमध्ये राडा झाल्याचा व्हिडीओ समोर आला असून हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.



गावातील रस्त्यावर सांडपाणी साचत असल्याने त्या ठिकाणी मुरूम टाकण्याची मागणी ग्रामसभेत करण्यात आली होती. याच मुद्द्यावरून वाद उफाळून आल्याचे सांगण्यात येत आहे.

## मयत शेतकऱ्यांच्या वारसांनाही कर्जमुक्तीचा लाभ मिळणार

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१९मुंबई** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत पात्र ठरलेल्या मात्र आधार प्रमाणीकरणापूर्वी मयत झालेल्या शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांबाबत शासनाने मानक कार्यप्रणाली निश्चित केली आहे. संबंधित मयत शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर वारसांची नोंद करून, त्यांची माहिती योजनेच्या पोर्टलवर अपलोड करण्यात येणार असून, पात्र वारसांना योजनेच्या निकषांनुसार कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे.राज्य शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे ही योजना सुरू केली आहे. योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन प्रणालीद्वारे करण्यात येत असून महाआयटीमार्फत १६.९६ लाख पात्र लाभार्थ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यापैकी १३.४८ लाख लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले असून उर्वरित लाभार्थ्यांचे प्रमाणीकरण सुरू आहे.पहिल्या यादीतील काही शेतकरी आधार प्रमाणीकरणापूर्वीच मयत झाल्याचे बँकांच्या निदर्शनास आले आहे. शासन निर्णयानुसार आधार प्रमाणीकरणाशिवाय कर्जमुक्तीचा लाभ देता येत नसल्याने अशा कर्जखात्यांसाठी वारस नोंद करून सुधारित माहिती योजना पोर्टलवर अपलोड करण्याची प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. संबंधित कर्जदार शेतकरी मयत झाल्याची माहिती वारसाकडून प्राप्त झाल्यानंतर बँकेने आपल्या प्रचलित धोरणानुसार कर्जखात्यावर वारसांची नोंद करावी. त्यानंतर योजनेच्या पोर्टलवरील सुविधेद्वारे वारसांची माहिती अपलोड करावी.



## संपादकीय ......

# भाजपचे 'नवीन' पर्व

राजकारणात संघटनात्मक फेरबदल ही नवी बाब नाही. ती नैसर्गिक असतेच असे नाही. बरेचदा अपरिहार्यता आणि नव्या राजकीय समीकरणांची किनारही त्याला असते. पक्षाच्या पुढील वाटचालीचे संकेत त्यातून मिळत असतात. भाजपने राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची नवी फळी जाहीर करून सध्या दिलेला संदेशही त्यामुळेच महत्त्वाचा ठरतो. पक्षाध्यक्ष नितीन नवीन यांनी जाहीर केलेल्या नव्या राष्ट्रीय कार्यकारिणीत अनुभवी आणि तुलनेने तरुण पदाधिकाऱ्यांचा समावेश करतानाच राज्यनिहाय समतोल साधण्याचा प्रयत्न दिसतो. ६५ जणांच्या या यादीत जवळपास ५० नवे चेहरे असून १२ महिला आहेत. आगामी विधानसभा निवडणुका आणि त्यानंतर २०२९ च्या लोकसभा निवडणुकीची तयारी या व्यापक पार्श्वभूमीवर हा फेरबदल केला आहे. भाजप हा गेल्या दशकात देशातील सर्वांत प्रभावशाली राजकीय संघटनांपैकी एक बनला आहे. निवडणुकीच्या राजकारणात त्याची ताकद केवळ लोकप्रिय नेतृत्वावर अवलंबून नसून तळागाळातील संघटनात्मक जाळ्यावरही उभी आहे. त्यामुळे राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची निवड करताना कोणत्या प्रदेशाला किती प्रतिनिधित्व दिले जाते, कोणत्या सामाजिक समूहाला किती स्थान दिले जाते आणि कोणत्या नेत्याला कोणती जबाबदारी दिली जाते, याला विशेष अर्थ असतो. नवीन यांच्या नव्या टीममध्ये २३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना प्रतिनिधित्व दिले आहे. पैकी चार आदिवासी प्रतिनिधींमध्ये महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश आणि ईशान्य भारतातील नेत्यांचा समावेश आहे; मात्र सामाजिक आणि भौगोलिक प्रतिनिधित्वाची आकडेवारी ही संघटनात्मक यशाची हमी नसते. प्रतिनिधित्वाचे राजकारण तेव्हाच अर्थपूर्ण ठरते, जेव्हा त्या प्रतिनिधींना प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेत भूमिका मिळते आणि त्यांच्या प्रदेशातील राजकीय वास्तवाचा पक्षाच्या धोरणावर परिणाम होतो. अन्यथा विविधतेचे प्रदर्शन आणि प्रत्यक्ष सत्ताकेंद्र यांत दरी निर्माण होऊ शकते. भाजपसमोरचा आव्हानाचा भाग याच ठिकाणी आहे. पक्षाचा विस्तार मोठा झाला आहे. त्याच्या अपेक्षा आणि हितसंबंधही तितकेच व्यापक झाले आहेत. अशावेळी केंद्रीय नेतृत्व आणि राज्य पातळीवरील संघटना यांच्यातील समन्वय अधिक महत्त्वाचा ठरतो. पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नव्या रचनेत उत्तर प्रदेशला झुकते माप दिले आहे. येथील नवनियुक्त आठ नेत्यांपैकी स्मृती इराणी यांची राष्ट्रीय सरचिटणीसपदी नियुक्ती विशेष उल्लेखनीय आहे. या फेरबदलातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, राम माधव यांचे पुनरागमन. २०१४ नंतर भाजपच्या विस्ताराच्या काळात राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून माधव यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. ईशान्य भारतात पक्षविस्तार आणि जम्मू-काश्मीरमध्ये पीडीपीसोबतच्या युतीत त्यांचा सहभाग उल्लेखनीय होता. आता राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून त्यांना पुन्हा जबाबदारी दिली आहे. संघटन विस्तार आणि गुंतागुंतीच्या राजकीय आघाड्यांचे व्यवस्थापन याबाबतचा त्यांचा अनुभव पक्षाला पुन्हा उपयोगी पडू शकतो. माजी मुख्यमंत्री बिप्लबकुमार देब आणि तीरथसिंह रावत यांनाही पुन्हा महत्त्वाची भूमिका मिळाली. म्हणजेच भाजपने पूर्णपणे नव्या पिढीवर अवलंबून राहण्याऐवजी अनुभवाच्या राजकारणालाही नव्या चौकटीत स्थान दिले आहे. नवीन यांच्या नव्या टीमचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, इतर पक्षांतून भाजपमध्ये आलेल्या नेत्यांना मिळालेले स्थान. बैजयंत पांडा, डी. पुरंदेश्वरी आणि मनप्रीतसिंग बादल यांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या दिल्या. संदीप पाठक आणि रोहन गुप्ता या तुलनेने नव्या प्रवेशकांनाही राष्ट्रीय पातळीवर स्थान मिळाले. राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांचे पद कायम ठेवताना त्यांचे विरोधक सतीश पुनिया यांना सरचिटणीसपद दिले. विनोद तावडे, पीयूष गोयल, डॉ. भारती पवार आणि शिवप्रकाश या महाराष्ट्राच्या चार जणांचा नव्या टीममध्ये समावेश आहे. पक्षाची संघटनात्मक रचना प्रत्यक्ष जमिनीवर प्रभावीपणे राबविण्यात दाखवलेली चुणूक तावडे यांच्या निवडीच्या मुळाशी आहे. २०२२च्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत द्रौपदी मुर्मू यांच्या निवडणूक व्यवस्थापनाची जबाबदारी त्यांच्यावर होती. बिहारमध्ये प्रभारी म्हणून काम करताना राज्यातील सतत बदलणाऱ्या राजकीय समीकरणांमध्ये भाजप आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीची रणनीती ठरविण्यात ते महत्त्वाच्या भूमिकेत राहिले. २०२३ मध्ये संयुक्त जनता दल आणि राष्ट्रीय जनता दलाच्या सरकारऐवजी रालोआचे सरकार सत्तेवर येण्यातही त्यांची संघटनात्मक भूमिका महत्त्वाची मानली गेली. लोकसभा निवडणुकीपासून बिहार विधानसभा निवडणूक विजयापर्यंत त्यांच्या कामाची सातत्यपूर्ण छाप दिसून आली.

काही जुन्या आणि प्रभावशाली चेहऱ्यांना नव्या राष्ट्रीय संघटनेत बाजूला केले आहे. अमित मालवीय हे यातील सर्वाधिक चर्चेत असणारे नाव. भाजपच्या माहिती-तंत्रज्ञान विभागाच्या नेतृत्वात त्यांनी दीर्घकाळ काम केले. आता त्यांच्या जागी दीपक म्हस्के यांना जबाबदारी दिली आहे. ६५ जणांच्या संघात सहा पदाधिकारी ४० वर्षांखालील, १५ जण ४० ते ४९ या वयोगटातील आणि २१ जण ५० ते ५९ या वयोगटातील आहेत. तीन माजी मुख्यमंत्री यात आहेत. आकडेवारीचा हा मेळ भाजपला एका बाजूला अनुभवी नेतृत्व टिकवून ठेवायचे आहे आणि दुसऱ्या बाजूला पुढील पिढीला संघटनेच्या मध्यवर्ती पातळीवर आणायचे आहे, असे सूचित करतो. पक्षाध्यक्ष तुलनेने तरुण असल्याने त्यांची कार्यपद्धती आणि नव्या टीमची रचना यांत तरुणाईला मिळालेले स्थान विशेष महत्त्वाचे ठरते; पण तरुण चेहऱ्यांना स्थान देणे आणि तरुण मतदारांच्या प्रश्नांना राजकीय अजेंड्यावर स्थान देणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. देशात तरुणाईसमोर रोजगार, शिक्षण, स्पर्धा परीक्षांतील अनागोंदी आणि महागाई हे प्रश्न आहेत. नव्या संघटनेने या प्रश्नांना धोरणात्मक चर्चेच्या केंद्रस्थानी आणणे गरजेचे आहे. काँग्रेसप्रमाणे निवडणूक संपली की संघटना विसावते, असे भाजपचे स्वरूप नाही. निवडणूक नसतानाही पक्षाची यंत्रणा कार्यरत असते. नवीन यांना नवी टीम उभी करण्यासाठी सहा महिन्यांहून अधिक काळ लागला असला, तरी अखेर समोर आलेली रचना संतुलित दिसते. भाजपने धाडसी उलथापालथ करण्याऐवजी नियंत्रित बदलाचा मार्ग स्वीकारला आहे. यामुळे लगेचच पक्षाच्या राजकीय दिशेत मोठा बदल होईल असे मानणे घाईचे ठरेल; मात्र संघटना अधिक व्यापक, लवचिक आणि निवडणूककेंद्री करण्याचा प्रयत्न यातून स्पष्टपणे दिसतो. भाजपसमोरील खरी कसोटी या टीमच्या कामगिरीची असेल. विविध गटांना एकत्र ठेवणे, राज्यांतील अंतर्गत संघर्ष नियंत्रित करणे, नव्या मतदारांशी संवाद वाढवणे आणि अनुभवी नेतृत्वाचा प्रभावी वापर करणे हे आव्हान नवीन यांच्यासमोर असेल. जुन्या अनुभवाला नव्या ऊर्जेची जोड किती परिणामकारकरीत्या दिली जाते, यावर या नव्या संघटनेचे यश अवलंबून असेल.

---

## सहायक निबंधक कार्यालयाला

# ध्वजारोहणाचा विसर

**अचलपूर येथील सहायक निबंधक कार्यालय**

कार्यालय भाड्याच्या इमारतीत असून कार्यालयासाठी जागेची मागणी करण्यात आली आहे. मी येण्यापूर्वीपासूनच अधिकारी-कर्मचारी बाजार समिती, उपविभागीय अधिकारी किंवा जिल्हा उपनिबंधक कार्यालयात ध्वजारोहणास उपस्थित राहतात. -परेश गुल्हाने सहायक निबंधक अधिकारी, अचलपूर.

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१९परतवाडा** - 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत प्रत्येक भारतीयाने आपल्या घरावर सन्मानपूर्वक राष्ट्रध्वज फडकवत स्वातंत्र्याचा उत्सव साजरा केला. विविध शासकीय, निमशासकीय कार्यालये, शाळा-महाविद्यालये व संस्था कार्यालयांमध्ये ही स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. मात्र, अचलपूर येथील सहायक निबंधक सहकारी संस्था कार्यालयात स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी ध्वजारोहण झाले नसल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे. तालुकास्तरावर सहकार क्षेत्रातील महत्त्वाचे कार्यालय म्हणून ओळखले जाणारे सहायक निबंधक सहकारी संस्था कार्यालय कॉटन मार्केट परिसरात आहे. या कार्यालयात सहायक निबंधक, सहकार अधिकारी श्रेणी-एक, सहकार अधिकारी श्रेणी-दोन, सहायक सहकार अधिकारी व कनिष्ठ लिपीक, असे अधिकारी-कर्मचारी कार्यरत आहेत. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी सदर कार्यालय बंद व कार्यालयाला कुलूप असल्याचे दिसून आले. याबाबत संबंधित विभागाशी संपर्क केला असता कर्मचारी लगतच्या कार्यालयात ध्वजारोहणासाठी गेले असल्याचे सांगण्यात आले. शासकीय कार्यालयात राष्ट्रीय सणांच्या दिवशी ध्वजारोहण होणे अपेक्षित असताना एका महत्त्वाच्या तालुका कार्यालयातच ध्वजारोहण न होणे ही बाब गंभीर मानली जात आहे. 'हर घर तिरंगा' अभियान मोठ्या उत्साहात राबविले जात असताना संबंधित कार्यालयात ध्वजारोहण होत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. याबाबत वरिष्ठ अधिकारी काय भूमिका घेतात, याकडे अचलपूर तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.



---

# पार्वतीनगर रेल्वे क्रॉसिंगवरील चुकीचे गतिरोधक हटवून रस्ता केला समतल

**किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मिलिंद बांबल यांच्या पाठपुराव्याला यश**



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती :**

अमरावती-भातकुली-दर्यापूर मार्गावरील पार्वतीनगर रेल्वे क्रॉसिंग गेट क्रमांक डउ/३ जवळ रेल्वे विभागाने चुकीच्या पद्धतीने उभारलेल्या मोठ्या गतिरोधकांमुळे वाहनचालक व नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. या ठिकाणी आधीच मोठमोठे खड्डे पडले असल्याने अपघातांचा धोका वाढला होता. तसेच गतिरोधकांमुळे चारचाकी वाहनांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत होत्या.या समस्येची दखल घेत भाजपा किसान मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष मिलिंद बांबल यांनी रेल्वे विभागाचे एडीईएन राणे यांच्याशी फोनवर चर्चा करून सातत्याने पाठपुरावा केला. तसेच रेल्वे प्रशासनाला निवेदन देत चुकीचे गतिरोधक काढून नियमानुसार गतिरोधक बसवावेत, तसेच परिसरातील खड्डे बुजवून रस्ता समतल करावा, अशी मागणी केली होती. तातडीने कार्यवाही न झाल्यास आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता.बांबल यांच्या मागणीची गंभीर दखल घेत रेल्वे प्रशासनाने पार्वतीनगर रेल्वे क्रॉसिंग गेट क्रमांक डउ/३ परिसरातील मोठे गतिरोधक समतल केले. त्याचबरोबर रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्ता लेव्हल करण्यात आला. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या शेतकरी, नागरिक आणि वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.अमरावती शहरातून भातकुली तालुक्यातील ग्रामीण भागासह दर्यापूरकडे जाण्यासाठी हा महत्त्वाचा मार्ग आहे. त्यामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. रेल्वे प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीमुळे नागरिकांचा त्रास दूर झाल्याने परिसरातील नागरिकांनी मिलिंद बांबल यांचे अभिनंदन करून आभार मानले.-

---

# चिखलाच्या वाटेला मुरमाचा आधार



**कांडली ग्रामपंचायतकडून विद्यार्थ्यांसह नागरिकांना दिलासा**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९चिखलदरा**

पांडुरंगनगर ते कविठा-लाखनवाडी मार्गावरील चिखल व खड्ड्यांमुळे शाळकरी विद्यार्थी आणि नागरिकांना मोठी कसरत करावी लागत होती. आंदोलनाचा इशारा आणि 'सकाळ'ने प्रश्नाला वाचा फोडल्यानंतर कांडली ग्रामपंचायतने रस्त्यावर मुरूम टाकून खड्डे बुजविले. मागील अनेक वर्षांपासून या मार्गाची दुरवस्था झाली आहे. पावसाळ्यात रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण होत असल्याने विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत होता. गेल्या १५ वर्षांपासून नागरिकांना या समस्येला सामोरे जावे लागत असून, प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी होती. नागरिकांकडून कर भरूनही मूलभूत सुविधा मिळत नसल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. सामाजिक कार्यकर्ते तथा पर्यावरण संघटनेचे अध्यक्ष योगेश खानझोडे यांनी या रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांना चिखलातूनच वाट काढण्याची वेळ आली असल्याचे सांगितले होते. रस्त्याची तातडीने दुरुस्ती न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. यानंतर 'सकाळ'ने या प्रश्नाला वाचा फोडल्यानंतर कांडली ग्रामपंचायतने संबंधित रस्त्यावर मुरूम टाकला. तसेच रस्त्यावरील खड्डे बुजवून मार्ग वाहतुकीसाठी मोकळा केला. मात्र, दरवर्षी पावसाळ्यात निर्माण होणारी समस्या केवळ मुरूम टाकून कायम स्वरूपी सुटणार का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या मार्गाचे कायमस्वरूपी मजबुतीकरण करून पक्का रस्ता तयार करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

---

# अंबानगरीत २१ ऑगस्टला 'वॉक फॉर वॉटर' वॉकेथॉन

## जिल्हाधिकाऱ्यांचे नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती-**

जिल्ह्यात १५ ते २१ ऑगस्ट दरम्यान जलसंधारण सप्ताह राबविण्यात येणार आहे. या निमित्ताने आठवडाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २१ ऑगस्ट रोजी 'वॉक फॉर बॉटर बॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले असून नागरीकांनी मोठ्या संख्येत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे. युवा पिढीच्या कल्पकतेला मंच उपलब्ध करून देत जलसंधारणावर आधारीत रील्ससाठी आकर्षक पारितोषिकही प्रदान करण्यात येणार आहेत.मृद व जलसंधारण विभागामार्फत संपूर्ण राज्यात १५ ते २१ ऑगस्ट या कालावधीत 'जलसंधारण सप्ताह' राबविण्यात येत आहे. अमरावती जिल्ह्यातील आयोजनाच्या पूर्व तयारीसाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी आढावा घेतला. जिल्ह्यात जलसंधारण सप्ताह अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे राबविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी विविध उपक्रमांची घोषणाही केली. या अंतर्गत 'पाणी बचत' आणि 'जलसंधारणाचा व्यापक संदेश देण्या साठी २१ ऑगस्ट रोजी 'बॉक फॉर वॉटर' ही विशेष वॉकेथॉन आयोजित करण्यात आली आहे.



या उपक्रमात जिल्ह्यातील सर्व नागरिक, तरुण, विद्यार्थी आणि शासकीय कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. युवा पिढीला या अभियानात जोडण्यासाठा आणि जलसंधारणाचा संदेश घरोघरी पोहोचवण्यासाठी सोशल मीडिया 'रील्स स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. जलसंधारणावर आधारित सर्वोत्कृष्ट रील्स तयार करणाऱ्यांना जिल्हा प्रशासनातर्फे २५ हजारांचे प्रथम पारितोषिक, १५ हजारांचे द्वितीय तर १० हजारांचे तृतिय पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सांगितले. जलसंधारण सप्ताहाच्या निमित्ताने संपूर्ण जिल्ह्यात वृक्षलागवड, श्रमदान, जनजागृती कार्यक्रम, व्याख्याने तसेच शाळा-महाविद्यालयांमध्ये चित्रकला आणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी, सामाजिक संस्थांनी आणि विद्यार्थ्यांनी या सर्व उपक्रमांमध्ये व वॉकेथॉनमध्ये सहभागी होऊन जलसंधारण सप्ताह यशस्वी करण्याचे आवाहन श्री. येरेकर यांनी केले आहे.-

---

# ऑक्टोबरपासून वाळूघाटांचा ई-लिलाव : ५३ घाटांची प्रक्रिया सुरू

## १४ तहसील कार्यालयांकडून प्रस्ताव मागविले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती**

पावसाळा संपताच जिल्ह्यात कायदेशीर वाळूचा पुरवठा सुरू करण्याच्या दृष्टीने प्रशासनाने हालचाली गतिमान केल्या आहेत. जिल्ह्यातील एकूण ५३ वाळू घाटांच्या लिलावाची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, ऑक्टोबर महिन्यापासून प्रत्यक्ष ई-लिलाव होण्याची शक्यता आहे. यासाठी जिल्हा खनिकर्म विभागाने जिल्ह्यातील १४ तहसील कार्यालयांकडून संबंधित वाळू घाटांचे प्रस्ताव मागविले आहेत.

यंदा जिल्ह्यातील वाळू घाटांच्या लिलाव प्रक्रियेला विलंब झाला. एकूण घाटांपैकी ३३ घाटांचा तब्बल तीन महिन्यांच्या विलंबानंतर जानेवारी महिन्यात लिलाव करण्यात आला होता. मात्र, लिलावानंतर कंत्राटदारांना केवळ पाच महिनेच व्यवसाय करता आला. ९ जून रोजी या सर्व ३३ वाळू घाटांचा ताबा महसूल विभागाने पुन्हा घेतला. दरम्यान, उपलब्ध घाटांपैकी २० घाटांना लिलावासाठी प्रतिसाद न मिळाल्याने ते अद्याप लिलावाविना आहेत. त्यामुळे आता जिल्ह्यातील सर्व ५३ वाळू घाटांची लिलाव प्रक्रिया एकत्रितपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रक्रियेचा प्राथमिक टप्पा सुरू झाला असून, तहसील कार्यालयांकडून घाटानिहाय प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. प्रस्तावांमध्ये संबंधित घाटावरील उपलब्ध वाळूसाठा, नदीपात्राची सद्यस्थिती, उत्खननासाठी आवश्यक तांत्रिक माहिती आणि इतर आवश्यक बाबींचा समावेश करण्यात येणार आहे.सध्या पावसाळा सुरू असल्याने नद्या व नाल्यांमध्ये पाण्याचा प्रवाह कायम आहे. त्यामुळे वाळू घाटांची प्रत्यक्ष पाहणी, मोजणी आणि वाळूसाठ्याचे मूल्यांकन करण्याच्या कामाला काहीसा विलंब होत आहे. मात्र, सप्टेंबरअखेरपर्यंत सर्व तहसील कार्यालयाकडून प्रस्ताव जिल्हा खनिकर्म विभागाकडे प्राप्त होण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर प्रस्तावांची छाननी, प्रशासकीय मंजुरी आणि पर्यावरणविषयक प्रक्रिया पूर्ण करून ऑक्टोबरपासून ई-लिलावाला सुरुवात होण्यार्क शक्यता आहे.



**अवैध वाळू उपशाला बसणार आळा ?**

लिलाव प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जिल्ह्यात कायदेशीररीत्या बाळू उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. सध्या कायदेशीर वाळूचा पुरवठा मर्यादित असल्याने बांधकाम क्षेत्राला अडचणींचा सामना करावा लागत आहे. अधिकृत वाळू घाट सुरू झाल्यानंतर नागरिकांना आणि बांधकाम व्यावसायिकांना कायदेशीर मागनि वाळू उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होईल तसेच अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीलाही आका बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.-

---

# दोन वर्षांचा संघर्ष संपला, सुपर रुग्णालयात ७६ वे किडनी प्रत्यारोपण यशस्वी

## पतीच्या आयुष्यासाठी २७ वर्षीय पत्नीचा त्याग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती**


विवाहाच्या वेळी सुख-दुःखात साथ देण्याची घेतलेली शपथ अनेक जण शब्दांत निभावतात, मात्र अकोला जिल्ह्यातील हर्षदा विनोद आंबेकर यांनी ती कृतीत उतरवून दाखविली. पतीच्या जीवावर बेतले असताना स्वतःच्या आयुष्याचा विचार न करता अवघ्या २७ व्या वर्षी त्यांनी आपली एक किडनी पतीला दान केली. पत्नीच्या या त्यागामुळे दोन वर्षांपासून डायलिसिसवर असलेल्या पतीला नवजीवन मिळाले. अमरावतीच्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयात ७६ वे किडनी प्रत्यारोपण यशस्वी झाले. या शस्त्रक्रियेतून वैद्यकीय यशासोबतच पती-पत्नीच्या नात्यातील प्रेमाची हृदयस्पर्शी कहाणी समोर आली आहे. अकोला जिल्ह्यातील सारकिन्ही येथील ३८ वर्षीय विनोद महादेवराव आंबेकर मागील काही वर्षांपासून किडनीच्या आजाराने त्रस्त होते. गेल्या दोन वर्षांपासून त्यांच्यावर डायलिसिस सुरू होते. डायलिसिसचा वाढता त्रास आणि त्यावर दीर्घकाळ अवलंबून राहण्याची परिस्थिती पाहता किडनी प्रत्यारोपण हाच योग्य पर्याय असल्याचे डॉक्टरांनी कुटुंबीयांना सांगितले. ही माहिती समोर येताच पत्नी हर्षदा यांनी पतीसाठी स्वतःची किडनी देण्याचा निर्णय घेतला. 'पतीच्या आयुष्यापेक्षा मोठे काहीही नाही,' या भावनेतून त्यांनी स्वतःच्या शरीराचा एक भाग देऊन पतीला आयुष्याची नवी संधी दिली. आवश्यक वैद्यकीय तपासण्या व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हर्षदा यांची एक किडनी विनोद यांना प्रत्यारोपित करण्यात आली. शस्त्रक्रिया यशस्वी झाली असून विनोद यांची प्रकृती सुधारत आहे. डायलिसिसच्या वेदना आणि अनिश्चिततेतून त्यांची सुटका झाली असून, त्यांना आता नव्या आयुष्याची आशा मिळाली आहे. विशेष म्हणजे, संपूर्ण किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत विनामूल्य करण्यात आली. वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफ्रॉलॉजिस्ट डॉ. अविनाश चौधरी, युरो सर्जन डॉ. राहुल पोटोडे, डॉ. विक्रम देशमुख, डॉ. प्रतीक चिरडे, डॉ. विशाल बाहेकर, बधिरीकरण तज्ज्ञ डॉ. रोहित हातगावकर, डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ. दीपाली देशमुख, डॉ. अश्विनी मढावी, डॉ. शीतल सोळंकी, डॉ. विक्रांत कुळमेथे, डॉ. माधव ढोपरे, डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ. नाहीद, डॉ. रमणीय, डॉ. उज्ज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव यांच्यासह संपूर्ण वैद्यकीय पथकाने शस्त्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली. समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शीतल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ. सोनाली चौधरी, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतील एमसीओ डॉ. पायल रोकडे, डॉ. दिव्यांनी मुंदाने, कल्याणी गाढवे तसेच अधीसेविका चंदा खोडके, मालती प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली परिचारिका, आहारतज्ज्ञ, औषध विभागातील कर्मचारी व इतर कर्मचाऱ्यांनीही सहकार्य केले.




आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# भीषण ट्रक-कार अपघातात उद्योजक किशोर काकाणी यांचा मृत्यू

## अमरावती-अकोला महामार्गावर थरारक अपघात






**कारचा चेंदामेंदा, मृतदेह बाहेर काढण्यासाठी पोलिसांचे शर्थीचे प्रयत्न**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ अमरावती-** अमरावती-अकोला महामार्गावरील लोणीजवळ मंगळवारी रात्री ट्रक आणि एस-क्रॉस कारची भीषण धडक होऊन शासकीय कंत्राटदार व उद्योजक किशोर काकाणी (वय ५८) यांचा जागीच मृत्यू झालो. धडक एवढी भीषण होती की, कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. अपघातानंतर किशोर काकाणी यांचामृतदेह कारमध्ये अडकून पडल्याने पोलिसांना तो बाहेर काढण्यासाठी मोठे शर्थीचे प्रयत्न करावे लागले.

मिळालेल्या माहितीनुसार, अम राबती येथील बियाणी कॉलेज, दसरा मैदानासमोर राहणारे किशोर काकाणी है मूळचे कामरगाव येथील रहिवासी होते, ते पारश्री हॉस्पिटलचे संचालक डॉ. श्रीगोपाल राठी यांचे मेहुणे होते.मंगळवारी रात्रौ साडेआठ वाजताच्या सुमारास ते कामरगाव येथून अम रावतीकडे येत होते. लोणी परिसरातील हटिल संधूजवळ त्यांनी कार उभी केली होती. त्याच वेळी अकोल्याच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव ट्रकने रस्ता दुभाजक ओलांडून त्यांच्या कारला जोरदार धडक दिली.या भीषण अपघातात किशोर काकाणी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताचा मोठा आवाज झाल्याने हॉटेलमधील ग्राहक तसेच मार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती लोणी पोलिसांना देण्यात आली. काही वेळातच ठाणेदार सानप यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. ट्रक आणि कार एकमेकांत अडकल्याने किशोर काकाणी यांचा मृतदेह बाहेर काढण्यासाठी पोलिसांना शर्थीचे प्रयत्न करावे लागले. पोलिसांनी मृतदेह कारमधून बाहेर काढून शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविला. घटनेची माहिती मिळताच पारश्री हॉस्पिटलचे संचालक डॉ. श्रीगोपाल राठी हेही घटनास्थळी दाखल झाले. याप्रकरणी पोलिसांनी ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली.किशोर काकाणी यांच्या आकस्मिक निधनाने अमरावती आणि कामरगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. ज्येष्ठ आयएएस अधिकारी सुरेश काकाणी यांचे ते लहान भाऊ होते. 'त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले डॉ. प्रतीक व डॉ. शुभम, तीन भाऊ मोहनलाल, द्वारकाप्रसाद व सुरेश, दोन बहिणी सुशीला व डॉ. निर्मल राठी, सुना, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.-

# न्यायाधीन बंदीचा तुरुंगाधिकाऱ्यावर हल्ला

## कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती-** अमरावती मध्यवर्ती कारागृहात दैनंदिन संचार फेरीदरम्यान एका न्यायाधीन बंदीने तुरुंगाधिकाऱ्यावर धावून जात त्यांची कॉलर पकडून मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी तुरुंगाधिकारी श्रेणी-१ धनसिंग धोंडीबा कवाळे यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी न्यायाधीन बंदी निखील कैलास पाटील (वय २४, रा. मांडळ, ता. अमळनेर, जि. जळगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

निखील पाटील हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्याविरुद्ध विविध जिल्ह्यांत एकूण २२ गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे. शहरातील न्यायाधीशांच्या निवासस्थानी झालेल्या चोरीच्या प्रकरणातही त्याचा सहभाग असल्याचे सांगण्यात आले. भातकुली येथील चोरीच्या गुन्ह्यात अटक झाल्यानंतर ६ ऑक्टोबर २०२५ पासून तो अमरावती कारागृहात न्यायाधीन बंदी म्हणूनआहे. त्याला न्यू बॅरेक परिसरातील बॅरेक क्रमांक १३ मध्ये ठेवण्यात आले आहे.मंगळवारी सकाळी कारागृहाचे अधीक्षक, उपअधीक्षक, वरिष्ठ तुरुंगाधिकारी धनसिंग कवाळे, सर्कल तुरुंगाधिकारी हेमंत इंगोले, ज्योती आठवेले, राजेंद्र राठोड, विठ्ठल पवार, श्रीकृष्ण लांजेवार, शिपाई नितीन भोयर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी दैनंदिन संचार फेरीसाठी बॅरेक क्रमांक १३ येथे गेले होते. बंद्यांच्या अडचणी व विनंत्यांचे निराकरण सुरू असताना निखील पाटील अचानक कवाळे यांच्यावर धावून गेला. त्याने त्यांची कॉलर पकडून मारहाण व शिवीगाळ केली. इतर कर्मचाऱ्यांनी हस्तक्षेप करून कवाळे यांची सुटका केलीं.

दरम्यान, कारागृहातील यापूर्वीच्या मोबाईल व गांजा सापडण्याच्या घटनांसह अधिकारी-कर्मचाऱ्यांवरील हल्ल्यांमुळे सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे कारागृह प्रशासनाच्या नियंत्रण व्यवस्थेबाबतही चर्चा सु झाली आहे.

# अमरावती जिल्ह्यात २१ लाख ९२ हजार मतदार

## एसआयआरची प्रक्रिया आटोपली, ३.५३ लाख मतदार वगळले



| मतदारसंघनिहाय मतदार | |
|---|---|
| धामणगावरेल्वे | २, ६९, ४११ |
| बडनेरा | ३, १०, ९६४ |
| अमरावती | २, ९९, ६०७ |
| तिवसा | २, ४७, २४० |
| दर्यापूर | २, ७५, ८५३ |
| मेळघाट | २, ७३, ७६२ |
| अचलपूर | २, ५३, ३०६ |
| मोर्शी | २, ६२, ४७८ |

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१९अमरावती-** विशेष सखोल पुनरीक्षणाची (एसआयआर) प्रक्रिया पूर्ण झाली असून अमरावती जिल्ह्यातील २५ लाख ४५ हजार ६७७ मतदारांचे डिजिटायझेशन झाले आहे. आठ मतदारसंघात १३ टक्के मतदार नवीन यादीतून वगळण्यात आले असून आता जिल्ह्यात २१ लाख ९२ हजार ६२१ मतदारयादीत समाविष्ट झाले आहेत. प्रारूप मतदारयादी येत्या २४ ऑगस्टला प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

एसआयआरनंतर बडनेरा मतदारसंघ सर्वाधिक तीन लाख १० हजार ९६४ मतदारांचा झाला आहे. जिल्ह्यात एक ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदारयाद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात आला आहे. या अंतर्गत गणना अर्जांचे वितरण व डिजिटायझेशनचे काम करण्यात आले असून ते शंभर टक्के पूर्ण झाल्याचे निवडणूक विभागाने म्हटले आहे. मतदारयादीतून तीन लाख ५३ हजार ५६ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. यामध्ये मृत, अनुपस्थित, कायम स्थलांतरित, इतर व दुबार मतदारांचा समावेश आहे. वगळण्यात आलेले सर्वाधिक ७५, ७८६ मतदार अमरावती विधानसभा मतदारसंघातील आहेत, तर मोर्शी मतदारसंघात २६ हजार ४६५ मतदारांचा समावेश आहे. एकूण मतदारांच्या तुलनेत वगळण्यात आलेल्या मतदारांचे प्रमाण १३.८७ टक्के आहे. विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत तयार झालेली प्रारूप मतदारयादी २४ ऑगस्टला प्रसिद्ध करण्यात येणार आहे. यापूर्वी १३ ऑगस्टला वगळण्यात आलेल्या मतदारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यावेळी तीन लाख ३० हजार मतदारांचा समावेश होता, त्यामध्ये वृद्धी झाली असून आता ही संख्या तीन लाख ५३ हजार ५६ वर गेली आहे. ज्या मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत, मात्र ते संबंधित मतदारसंघात आहेत त्यांना प्रारूपयादी प्रसिद्ध झाल्यानंतर नवीन मतदार नोंदणी करता येणार आहे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# वाढीव मालमत्ता कराच्या नावाखाली अमरावतीकरांचा विश्वासघात

## काँग्रेसचे मुन्ना राठोड व समीर जवंजाळ यांचा भाजपवर हल्लाबोल





**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९ अमरावती** अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वाढीव म ालमत्ता कराच्या प्रस्तावाला स्थगिती देऊन नागरिकांची दिशाभूल करण्यात आली आणि निवडणुका होताच ही स्थगिती उठविण्यात आली, असा गंभीर आरोप काँग्रेसने केला आहे. भाजपने अमरावतीतील सुमारे तीन लाख म ालमत्ताधारकांचा विश्वासघात केल्याचा आरोप काँग्रेसचे माजी नगरसेवक मुन्ना राठोड व जिल्हा औद्योगिक सेलचे अध्यक्ष समीर जवंजाळ यांनी केला.

सन २०२३-२४ मध्ये महापालिका प्रशासनाने मालमत्तांचे सर्वेक्षण व मूल्यांकन करून मालमत्ता करात मोठी वाढ प्रस्तावित केली होती. या वाढीमुळे काही प्रकरणांत पूर्वीचा एक हजार रुपयांचा कर थेट दहा हजार रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. या निर्णयाविरोधात नागरिक सुरक्षा कृती समिती तसेच काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले होते. मालमत्ताधारकांनी हरकती नोंदवूनही त्यांना योग्य पद्धतीने सुनावणीची संधी देण्यात आली नसल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

मालमत्तांच्या सर्वेक्षणाचे कंत्राट देताना निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

संबंधित स्थापत्य कंपनीचा करार रद्द करून संपूर्ण प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, १० ऑगस्ट रोजी शासनाने वाढीव मालमत्ता करावरील स्थगिती उठविल्याने आता नागरिकांवर पुन्हा करवाढ लादण्याचा मार्ग मोकळा झाल्याचा दावा मुन्ना राठोड व समीर जवंजाळ यांनी केला. येत्या २० ऑगस्ट रोजी होणाऱ्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत वाढीव मालमत्ता कराचा प्रस्ताव विखंडित करून शासनाकडे पाठवावा, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. अन्यथा नागरिकांच्या हितासांठी तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मुन्ना राठोड व समीर जवंजाळ यांनी दिला.

# निवृत्त न्यायाधीशांच्या बंद घरात चोरी ११ लाख ९० हजारांचा ऐवज लंपास



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९परतवाडा-** शहरातील नायरा पेट्रोल पंप परिसरातील एका सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या बंद घरात चोरट्यांनी धाडसी चोरी करून सुमारे ११ लाख ९० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.. चोरट्यांनी घरातून ८० ग्रॅम सोन्याचे दागिने, २०० ग्रॅम चांदीचे दागिने आणि १ लाख ८० हजार रुपयांची रोकड चोरून नेली.मोहम्मद सादिक मोहम्मद उमर असे सेवानिवृत्त न्यायाधीशांचे नाव आहे. ते कुटुंबीयांसह नागपूर येथे वास्तव्यास असून, परतवाड्यातही त्यांचे घर आहे. आठवड्यातून एक-दोन दिवस ते परतवाड्यातील घरी येत असतात. दरम्यान, मंगळवारी सकाळी घरी आल्यानंतर त्यांना घराचा कडी-कोंडा तुटलेला दिसला. घरात जाऊन पाहणी केली असता चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.चार ते पाच चोरट्यांचा सहभाग?चोरी मध्यरात्री अडीच ते तीन वाजण्याच्या सुमारास झाली असावी, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या घटनेत चार ते पाच चोरट्यांचा सहभाग असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. परिसरातील काही सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज पोलिसांच्या हाती लागले असून, त्याच्या आधारे चोरट्यांची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.घटनेची माहिती मिळताच ठाणेदार अजय आकरे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख पोलिस निरीक्षक अशोक लांडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांकडून चोरट्यांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे.-

# एक्का-बादशहा जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड़१२ जुगारी अटकेत



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अंजनगाव सुर्जी -** तालुक्यातील खोडगावलगतच्या शहानूर नदीपात्रात सुरू असलेल्या एक्का-बादशहा जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकून १२ जुगाऱ्यांना जेरबंद केले. त्यांच्याकडून रोख रक्कम आणि ११ दुचाकी असा एकूण ७ लाख ३ हजार २१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नागपंचमीच्या पार्श्वभूम ीवर पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे जुगार खेळणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्याचे कर्मचारी परिसरात पेट्रोलिंग करीत होते. दरम्यान, खोडगाव रोडवरील स्म शानभूमीजवळील शहानूर नदीपात्रात भावलिंग मंदिराजवळ काही जुगारी एक्का-बादशहा जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलिसांच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाड टाकली. त्यावेळी जुगार खेळत असलेल्या १२ इसमांना ताब्यात घेण्यात आले.पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून २३ हजार २१० रुपये रोख आणि ११ मोटारसायकली असा एकूण ७लाख ३ हजार २१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून सर्व १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. नदीपात्रासारख्या निर्जन ठिकाणी सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावरपोलिसांनी अचानक धाड टाकल्याने परिसरात खळबळ उडाली. ही कारवाई अंजनगाव सुर्जीचे पोलीस निरीक्षक सुरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भारत चिरडे, पोलीस अंमलदार जयसिंग चव्हाण, शुभम मारकंड, रवि राठोड, अमित घाटे, आकाश रंगारी, प्रमोद चव्हाण, इक्बाल पठाण आणि विलास रावते यांनी केली.

# इंस्टाग्रामवर प्राणघातक शस्त्राचा फोटो व्हायरल; २० वर्षीय युवक ताब्यात




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती :** हातात प्राणघातक शस्त्र घेऊन त्याचा फोटो इन्स्टाग्रामवर व्हायरल करणाऱ्या २० वर्षीय युवकाला राजापेठ पोलिसांनी ताब्यात घेतले. वेदांत विनोदराव वर्गे (रा. शिव मंदिराजवळ, आदर्श नगर, गोपालनगर, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे.राजापेठ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांना सोशल मीडियावर एका युवकाचा शस्त्र हातात घेतलेला फोटो व्हायरल होत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर त्यांनी राजापेठ डी.बी. पथकाला तत्काळ कारवाईचे आदेश दिले.

पथकाचे प्रमुख सपोनि नितीन शिंदे व कर्मचाऱ्यांनी आरोपीचा शोध सुरू केला.दरम्यान, गोपालनगर येथील सुतगिरणीसमोर एक युवक प्राणघातक शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी वेदांत वर्गे याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून १२.५० इंच लांबीचा, ९ इंच पाते असलेला चायना चाकू, अंदाजे १,२०० रुपये किमतीचा, जप्त करण्यात आला.

आरोपीविरुद्ध राजापेठ पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७५७/२०२६ अन्वये कलम ४/२५ आर्म्स क्टसह कलम १३५ महाराष्ट्र पोलिस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली

# नवाथे चौकात ६ सप्टेंबरला भव्य विदर्भस्तरीय दहीहंडी

## अनेक सिनेवंत राहणार विशेष उपस्थिती

## भाजप-युवा स्वाभिमान पार्टीची संयुक्त तयारी



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९अमरावती-** भारतीय जनता पार्टी व युवा स्वाभिमान पार्टीच्या संयुक्त विद्यमाने रविवार, ६ सप्टेंबर २०२६ रोजी बडनेरा रोड, नवाचे चौक येथे भव्य विदर्भस्तरीय दहिहांडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी वायएसपी मार्गदर्शक सुनिल राणा यांच्या प्रमुख उपस्थितीत शंकर नगर येथील कार्यालयात बैठक पार पडली. विदर्भातील विविध भागांतून गोविंदा पथके सहभागी होणार असून, आकर्षक बक्षिसांसह प्रत्येक चमूला प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात येणार आहे.. दहिहांडी सोहळ्यात राजकीय नेते, सिने कलाकार, उद्योजक, धर्मगुरू,समाजसेवक व खेळाडू प्रमुख आकर्षण ठरणार आहेत. बालकांसाठी राधा-कृष्ण सजावट स्पर्धा, एकल व ग्रुप डान्स स्पर्धा, शैक्षणिक मदत, बेरोजगार युवक-युवतींना रोजगारासाठी सहाय्य, विधवा व निराधार महिलांना आर्थिक मदत तसेच शहीद वीर जवानांच्या कुटुंबीयांना आर्थिक सहाय्य देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सुरक्षा, वाहतूक, गोविंदा पथकांची नोंदणी, सांस्कृतिक कार्यक्रम व नागरिकांच्या सुविधांबाबतही बैठकीत चर्चा झाली. यावेळी उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नांना आमले,नगरसेवक प्रशांत वानखडे, जिल्हाध्यक्ष प्रकाश साबळे, जिल्हाध्यक्षा सोनाली नवले, नदेश अंबाडकर, प्रा. अजय गाडे, समाधान वानखडे, नगरसेविका सुमती ढोके, विनोद जायलवाल, शिवदास घुले, प्रमोद येवतीकर, संजय मुनोत, नगरसेवक अजय जयस्वाल, नगरसेवक किशोर जाधव, नगरसेविका रजनी डोंगरे, नगरसेवक दिपक सम्राट, नगरसेवक योगेश विजयकर, नगरसेवक महेश मुलचंदानी, नगरसेविका नंदा सावदे, नगरसेविका अर्चना पांडे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावकार मुक्तीसाठी आदिवासींचा सहकार विभागासमोर एल्गार

## २ सप्टेंबरला बैठक

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९अमरावती** मेळघाटातील भोळ्या भाबड्या आदिवासींची लूट करुन त्यांची शेती व संपत्ती हडपणाऱ्या सावकारांविरोधात आज, मंगळवार, १८ ऑगस्टला तेथील - आदिवासींनी येथील विभागीय सहनिबंधक कार्यालयासमोर धरणे दिले. शेवटी सहनिबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करुन तोडगा काढण्यासाठी आगामी २ सप्टेबर रोजी अचलपुर येथील सहायक निबंधक कार्यालयात बैठकीचे आयोजन केले आहे. सावकारमुक्तीसाठी आंदोलन करणार असल्याची पूर्वसूचना आदिवासी बांधवांनी यापूर्वीच

दिली होती. त्यानुसार धारणी, चिखलदरा व अचलपुर तालुक्यातील रामबाबू दहिकर, दयाराम ठाकरे, विठ्ठल हेकडे, दयाराम दहिकर, प्रवीण कासदेकर, श्यामलाल भुसुम, विलास दुर्गे, तुळशीराम येऊन, मुंगीलाल कासदेकर, सुनितातार्इ दारशिंबे, प्रतीक्षा भरावे, भागाय काळे, हरीश येवले, प्रवीण बेलसरे, लक्ष्मण बेलसरे, अक्षय कासदेकर, ॲड. बंड्याभाऊ साने व इतरांनी सकाळी १० वाजतापासून धरणे आंदोलन सुरु केले.यावेळी विभागीय सहनिबंधक वर्धन हे उपस्थित नव्हते. दरम्यानच्या काळात त्यांच्या कार्यालयातील इतर अधिकाऱ्यांनीत्यांच्याशी संपर्क साधून २ सप्टेंबरची अचलपूर येथील बैठक निश्चित केली. सावकाराकडे सोने, चांदीच्या वस्तू गहाण ठेऊन या आदिवासींनी शेतीसाठी कर्ज घेतले आहे. दरम्यान ज्या लोकांनी सावकारांकडून कर्ज घेतले आहे, त्यांना आपली वस्तू सोडवायची असेल, अशा लोकांनी येत्या २ सप्टेंबर रोजी अचलपूर येथे उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. गहाण ठेवलेल्या वस्तूवर नियमानुसारच व्याज देऊन आपली वस्तू सावकारा कडून मिळवून देऊ, असे सहकार विभागातील अधिकाऱ्यांतर्फे सांगण्यात आले. यावेळी एकूण १९ कर्जदार लोक उपस्थित होते.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस २७ सप्टेंबर ला अमरावतीत

## १० हजार कर्जमुक्त शेतकऱ्यांचा होणार महासन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी सन्मान कर्जमुक्ती योजनेच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी, अमरावतीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सन्मानार्थ भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा २७सप्टेंबर रोजी अमरावती येथे होणार असून, जिल्ह्यातील सुमारे १० हजार कर्जमुक्त शेतकऱ्यांना या मेळाव्यासाठी निमंत्रित करण्यात येणार आहे.

भाजपाचे राज्यसभा सदस्य खासदार डॉ. अनिल बोंडे, विधानपरिषद सदस्य आमदार प्रवीण पोटे पाटील, भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष तथा धामणगाव रेल्वेचे आमदार प्रतापदादा अडसड, तिवस्याचे आमदार राजेश वानखडे, महापौर श्रीचंद तेजवानी, माजी प्रदेश सचिव जयंत डेहणकर, महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी, मनपा सभागृह नेते चेतन गावंडे आणि जिल्हा सरचिटणीस नितीन गुडधे पाटील यांच्या शिष्टमंडळाने मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना मेळाव्याचे निमंत्रण दिले. मुख्यमंत्र्यांनी हे निमंत्रण स्वीकारले. अमरावती जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी सन्मान कर्जमुक्ती योजनेचा मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना लाभ झाला आहे. या कर्जमुक्त शेतकऱ्यांच्या उपस्थितीत शेतकरी प्रतिनिधींच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सन्मान करण्यात येणार आहे.



### दहीहंडी कार्यक्रमाचेही मुख्यमंत्र्यांना निमंत्रण

याशिवाय यंदाच्या श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या पर्वावर भारतीय जनता पार्टीच्या वतीने अमरावती येथे आयोजित करण्यात येणाऱ्या भव्य 'गोविंदा आला रे' दहींहंडी स्पर्धेचे निमंत्रणही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वीकारले आहे. त्यामुळे आगामी काळात अमरावतीत भाजपाच्या वतीने दोन मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात शेतकरी हिताच्या विविध योजना राबविण्यात आल्याचा दावा भाजपाकडून करण्यात आला. जलसिंचन योजना, शेतकरी वीजबिल माफी तसेच सौर ऊर्जा योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी शासनाने प्रयत्नकेल्याचे यावेळी सांगण्यात आले. मेळावा यशस्वी करण्यासाठी आमदार प्रवीण तायडे, आमदार उमेश यावलकर, आमदार केबलराम काळे यांच्यासह भाजपाचे सर्व जिल्हाध्यक्ष आणि पदाधिकारी संयुक्तपणे प्रयत्न करणार आहेत.

# 'वरिष्ठांचं कठोर वर्तन म्हणजे आत्महत्येस प्रवृत्त करणं नव्हे'

## दीपाली चव्हाण प्रकरणी सुप्रीम कोर्टाचा वन अधिकाऱ्याला दिलासा!



विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१९ नागपूर-** वरिष्ठ अधिकाऱ्याची प्रशासकीय कारवाई, कामाबाबतची तंबी, प्रतिकूल शेरे किंवा कठोर वर्तन यावरूनच कनिष्ठाने आत्महत्या केली म्हणून संबंधित अधिकाऱ्यावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा ठरविता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील हरिसाल येथील वनपरिक्षेत्र अधिकारी दीपाली चव्हाण यांच्या आत्महत्या प्रकरणात तत्कालीन उपवनसंरक्षक विनोद शिवकुमार यांना सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिला असून त्यांच्याविरुद्धची फौजदारी कारवाई रद्द केली आहे.

दीपाली चव्हाण यांनी २५ मार्च २०२१ रोजी हरिसाल येथे आत्महत्या केली होती. आत्महत्येपूर्वी त्यांनी तीन चिठ्ठ्या लिहिल्या होत्या. त्यापैकी एका चिठ्ठीत तत्कालीन उपवनसंरक्षक विनोद शिवकुमार यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले होते. वारंवार तंबी देणे, निलंबनाची धमकी देणे, रजेचे अर्ज नाकारणे, गर्भवती असताना सलग तीन दिवस पायी चालण्यास भाग पाडणे, त्यामुळे गर्भपात होणे तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यास कारणीभूत ठरणे, असे आरोप चव्हाण यांनी केले होते.

या प्रकरणात शिवकुमार यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३०६, ५०४ आणि ५०६ अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. त्यांच्याविरुद्धचा दोषारोपपत्राचा मार्ग मोकळा ठेवणारे आदेश अतिरिक्त सत्र न्यायालयाने आणि त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले होते. त्यानंतर शिवकुमार यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.

### 'प्रशासकीय कठोरपणा' पुरेसा नाही

वरिष्ठ अधिकाऱ्याचे प्रशासकीय निर्देश, शिस्तभंगाची कारवाई, कामगिरीबाबत प्रतिकूल शेरे किंवा कठोर वर्तन अप्रिय वाटले तरी, कनिष्ठाला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करण्याचा जाणीवपूर्वक हेतू दर्शविणारे अतिरिक्त पुरावे नसतील तर त्याला कलम ३०६ अंतर्गत आत्महत्येस प्रवृत्त करणे म्हणता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.यासाठी न्यायालयाने यापूर्वीच्या विविध निकालांचा आधार घेतला. केवळ मृत व्यक्तीला सातत्याने त्रास झाला आणि अखेरीस तिने आत्महत्या केली, एवढ्यावरून आरोपीकडून आत्महत्येस प्रवृत्त करण्याची 'मेन्स रिया' अर्थात गुन्हेगारी मानसिकता सिद्ध होत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

### शिवकुमार यांना दोषमुक्ती

निलंबनाच्या धमकीच्या आरोपाबाबतही न्यायालयाने संबंधित अधिकाऱ्याला स्वतःहून निलंबन करण्याचा अधिकार नसल्याचे नमूद केले. त्यामुळे कलम ५०४ आणि ५०६ अंतर्गतही आवश्यक घटक सिद्ध होत नसल्याचे न्यायालयाने म्हटले.आत्महत्येपूर्वीची जवळची प्रवृत्त करणारी कृती आणि स्पष्ट हेतू सिद्ध होत नसल्याने शिवकुमार यांच्याविरुद्ध खटला सुरू ठेवणे म्हणजे 'कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर' ठरेल, असे स्पष्ट करीत सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्याविरुद्धची कारवाई रद्द केली आणि त्यांना सत्र खटल्यातून दोषमुक्त केले.

# श्रावणात महादेवाला गंगाजल वाहणार, पोस्ट कार्यालयात ३० रुपयांत मिळणार

## ऑनलाइन मागणीसह घरपोच सुविधाही उपलब्ध; भाविकांची धावपळ थांबणार

**अरुण जोशी**
**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

श्रावण महिना सुरू होताच भगवान महादेवाच्या अभिषेकासाठी गंगाजलाची मागणी वाढते. भाविकांना आता गंगोत्रीतून आणलेले पवित्र गंगाजल भारतीय डाक विभागाच्या माध्यमातून सहज उपलब्ध होणार आहे. अवघ्या ३० रुपयांत २५० मिली गंगाजलाची बाटली पोस्ट कार्यालयातून मिळणार असून, ऑनलाइन मागणी केल्यानंतर ते घरपोच मिळविण्याची सुविधाही अमरावती मध्ये उपलब्ध आहे.श्रावणातील सोमवार तसेच विविध धार्मिक सणांच्या पार्श्वभूमीवर शिवमंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी होते. भगवान महादेवाच्या जलाभिषेकासाठी गंगाजलाला विशेष धार्मिक महत्त्व असल्याने अनेक भाविक त्याचा वापर करतात. गंगोत्रीपर्यंत जाणे शक्य नसलेल्या भाविकांसाठी पोस्ट विभागाची ही सुविधा उपयुक्त ठरणार आहे.

श्रावणातील सोमवारी गंगाजलाला विशेष पसंतीश्रावणातील प्रत्येक सोमवारी भगवान महादेवाच्या मंदिरांत जलाभिषेकासाठी भाविकांची गर्दी होते. अनेक भाविक शिवलिंगावर गंगाजल अर्पण करून पूजा करतात. त्यामुळे श्रावण महिन्यात गंगाजलाची मागणी वाढते. पोस्ट विभागामार्फत बाटलीबंद गंगाजल उपलब्ध झाल्याने भाविकांची गंगाजलासाठी होणारी धावपळ कमी होणार आहे.३० रुपयांत २५० मिली गंगाजलभारतीय डाक विभागामार्फत गंगोत्रीतून आणलेले गंगाजल बाटलीबंद स्वरूपात उपलब्ध करून दिले जाते. २५० मिली गंगाजलाची बाटली केवळ ३० रुपयांत मिळणार आहे. त्यामुळे गंगोत्रीला प्रत्यक्ष न जाता भाविकांना पवित्र गंगाजल सहज उपलब्ध होणार आहे.पोस्ट विभागाच्या ऑनलाइन सुविधेद्वारे गंगाजलाची मागणी करता येणार आहे. ऑनलाइन ऑर्डर केल्यानंतर पोस्टाच्या माध्यमातून घरपोच गंगाजल मिळविता येईल. त्यामुळे पोस्ट कार्यालयात प्रत्यक्ष जाणे शक्य नसलेल्या भाविकांनाही घरबसल्या गंगाजल मागविण्याची सुविधा मिळणार आहे.भगवान महादेवाला जलाभिषेक करण्याची धार्मिक परंपरा आहे. विशेषतः श्रावणातील सोमवारी शिवलिंगावर जल अर्पण केले जाते. गंगाजल पवित्र मानले जात असल्याने अनेक भाविक महादेवाच्या अभिषेकासाठी त्याचा वापर करतात. त्यामुळे श्रावणात गंगाजलाला विशेष मागणी असते.



### श्रावण : उत्सवांचा पवित्र महिना

श्रावण महिना हिंदू धर्मातील पवित्र महिन्यांपैकी एक मानला जातो. या महिन्यात सोमवारचे व्रत, भगवान महादेवाची पूजा, जलाभिषेक यांसह विविध धार्मिक उपक्रम होतात. नागपंचमी, नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधन आदी सणही याच कालावधीत येतात. त्यामुळे संपूर्ण महिनाभर मंदिरांसह परिसरात धार्मिक वातावरण पाहायला मिळते.-

# साहेब, केवळ तांदळाची खिचडी कशी शिजणार ?

## शाळांची अडचण वाढली

### दीड महिन्यानंतरही कडधान्ये व तेलाची प्रतीक्षा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

नव्या शैक्षणिक सत्राचे बिगुल वाजून तब्बल दीड महिन्यापेक्षा जास्त कालावधी उलटला आहे. मात्र, शाळांमध्ये दिला जाणारा शालेय पोषण आहार अद्याप पूर्ण साहित्यासह पोहोचलेला नाही. प्रशासन अखेर जागे होऊन मागील काही दिवसांपासून पोषण आहाराचा मुख्य घटक असलेला तांदूळ शाळांपर्यंत पोहोचवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. परंतु, केवळ तांदळाने खिचडी शिजवायची कशी? तेल, मीठ, कडधान्ये आणि मसाले यांसारखे 'धान्यादी साहित्य' अद्याप न पोहोचल्याने शाळा प्रशासनासमोर मोठा यक्षप्रश्न उभा राहिला आहे. प्रशासनाच्या या धिम्या कारभारामुळे जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळा उधारीच्या गर्तेत सापडल्या असून कर्जबाजारी झाल्या आहेत. गेल्या शैक्षणिक सत्रातील मार्च महिन्यात शाळांना शालेय पोषण आहाराचा पुरवठा करण्यात आला होता. मार्चनंतर एप्रिल महिन्यापर्यंत शाळा सुरू असल्याने तोपर्यंत जुना सर्व साठा पूर्णपणे संपला होता. जून महिन्यात नवीन शैक्षणिक सत्र सुरू झाल्यानंतर शाळांकडे एक दाणाही शिल्लक नव्हता. शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी स्थानिक दुकानदारांकडून पदरमोड करून किंवा उधारीवर धान्य त किराणा साहित्य खरेदी करण्यास सुरुवात केली. दररोज शेकडो विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी हजारो रुपयांचा खर्च करावा लागत असल्याने शाळांची आर्थिक बिघडली आहे.

### इंधन निधीची प्रतीक्षा

शालेय पोषण आहार शिजविण्यासाठी शाळांना इंधन निधी उपलब्ध करून दिला जातो. मागील अनेक महिन्यांपासून इंधन निधी न मिळाल्याने शालेय पोषण आहार शिजविणाऱ्या महिलांची अडचण वाढली आहे. पावसाळ्याच्या दिवसात चुलीवर स्वयंपाक करणे कठीण झाले आहे.

# सरकारी अधिकाऱ्यांना चाप....सरकारी खर्चाने व्हीआयपी नंबर आता बंद, खिशातले पैसे मोजून करा चॉइस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

शासकीय वाहनांसाठी व्हीआयपी किंवा फॅन्सी (चॉइस) नंबर घेण्याची कोणतीही कायदेशीर तरतूद नसतानाही, काही अधिकारी व कार्यालयांकडून विशिष्ट क्रमांकासाठी वारेमाप खर्च केला जात असल्याचे समोर आले होते. या उधळपट्टीला राज्य शासनाने आता पूर्णपणे चाप लावला आहे. यापुढे पसंतीच्या क्रमांकासाठी आरटीओकडे अतिरिक्त शुल्क भरल्यास त्याची प्रतिपूर्ती सरकारी निधीतून होणार नाही. त्यामुळे विशिष्ट क्रमांकाचा रुबाब दाखवायचा असल्यास तो खर्च संबंधित अधिकाऱ्याने स्वतःच्या खिशातूनच करावा लागणार आहे.

सामान्य नागरिकांमध्ये जशी आपल्या वाहनाला फॅन्सी नंबर मिळवण्याची क्रेझ असते, तशीच सुप्त हौस अनेक शासकीय अधिकाऱ्यांमध्येही दिसून येते. आपली प्रशासकीय ओळख आणि दर्जा इतरांपेक्षा वेगळा दिसावा, यासाठी सरकारी गाडीवरही व्हीआयपी नंबर मिळवण्याची धडपड सरकारी अधिकाऱ्यांकडून केली जाते.

**सरकारी खर्चाने वाहनांवर 'व्हीआयपी' रूबाब**

नवीन शासकीय वाहन खरेदी केल्यानंतर त्याला प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून सर्वसाधारण क्रमाने मिळणारा नंबर न घेता, पसंतीचा आणि व्हीआयपी नंबर मिळवण्यासाठी हजारो रुपयांचे अतिरिक्त शुल्क भरले जात होते.

हा सर्व खर्च सरकारी तिजोरीतून म्हणजेच जनतेच्या कराच्या पैशातून केला जात होता. यातून शासकीय निधीचा नाहक अपव्यय होत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे शासनाने निर्णय घेऊन खर्चावर बंधन घातले आहे.

जर एखाद्या अधिकाऱ्याला किंवा विभागाला आपल्या शासकीय वाहनावर विशिष्ट किंवा लकी नंबर हवाच असेल, तर शासनाची काहीही हरकत असणार नाही. मात्र, त्यासाठी लागणारे आरटीओचे सर्व अतिरिक्त शुल्क संबंधित अधिकाऱ्याला स्वतःच्या खिशातून भरावे लागेल. सरकारी निधीतून हा खर्च भागवता येणार नाही.




### राज्याच्या वित्त विभागाचे शासकीय कार्यालयांना स्पष्ट निर्देश

राज्य शासनाने वित्त विभागामार्फत स्पष्ट निर्देश जारी केले असून, यापुढे शासकीय वाहनांच्या खरेदी प्रक्रियेत व्हीआयपी किंवा चॉइस नंबरसाठी लागणाऱ्या कोणत्याही अतिरिक्त शुल्काचे बिल मंजूर केले जाणार नाही. लेखापरीक्षणात असा खर्च आढळल्यास संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित केली जाईल.

# सार्वजनिक गणेशोत्सवातील वर्गणी गोळा करण्यासाठी धर्मदाय आयुक्तांची पूर्वपरवानगी घ्यावी

## पूर्व परवानगी शिवाय वर्गणी गोळा केल्याचे सिद्ध झाल्यास शिक्षा

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१९अमरावती**

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था वगळून जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांतर्फे वर्गणी गोळा करण्याकरिता धर्मदाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मदाय आयुक्त अमरावती यांची पूर्वपरवानगी घ्यावी, असे आवहन धर्मदाय सह आयुक्त दीपक खोचे यांनी केले आहे. पूर्व परवानगी शिवाय वर्गणी गोळा केल्याचे सिद्ध झाल्यास तीन महिन्या पर्यंत साध्या कारावासाची किंवा संकलीत रकमेच्या दीडपट द्रव्य दंडाची शिक्षा होऊ शकते असेही सांगण्यात आले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ४१-क नुसार सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था वगळून जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांतर्फे गणेशोत्सव कार्यक्रमासाठी रोख रकमेच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात पैसा,देणगी किंवा वर्गणी गोळा करण्याच्या पूर्वपरवानगीकरिता ु.उहरीळीं.चरहरीरीहींर.सीं.ळप या संकेतस्थळावर आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करून धर्मदाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मदाय आयुक्त अमरावती यांच्या कडून पूर्वपरवानगी देण्यात येणार आहे. यासाठी ऑनलाई अर्ज पूर्ण भरावा व त्यासोबत गणेशोत्सव मंडळाच्या सर्व सदस्यांची स्वाक्षरी असलेल्या ठरावाची प्रत, सर्व सदस्यांचे ओळखपत्र, जागेबाबत जागा मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र, ग्रामपंचायत किंवा नगरपरिषद किंवा महानगरपालिका यांचे नाहरकत प्रमाणपत्र, अर्जातील माहिती सत्य व बरोबर असल्याबाबत अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र, मागील वर्षीच्या परवानगीची प्रत आणि मागील वर्षाच्या जमा खर्चाचा हिशोब जोडणे गरजेचे आहे.

नियमाचे उल्लंघन करून पूर्व परवनगी न घेता वर्गणी गोळा केल्याचे सिद्ध झाल्यास तीन महिन्या पर्यंत साध्या कारावासाची किंवा संकलीत रकमेच्या दीडपट द्रव्य दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकते असे धर्मदाय सह आयुक्त कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.-



# महामार्गाच्या हद्दीतील सर्व बेकायदा ढाबे, हॉटेल्सवर चालणार बुलडोझर

## राष्ट्रीय महामार्गावर कारवाईची तयारी सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

अमरावती जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गावर होणारे अपघात आणि वाहतूक कोंडी रोखण्यासाठी सुप्रीम कोर्टाने आक्रमक भूमिका घेतली आहे. महामार्गाच्या हद्दीतील सर्व बेकायदा ढाबे, हॉटेल्स आणि व्यावसायिक अतिक्रमणे पुढील बांधकामांवर बंदी घालण्याचे स्पष्ट ६० दिवसांत पाहण्याचे तसेच नवीन निर्देश दिले आहेत.

या आदेशाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने सर्व महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. याच पार्श्वभूमीवर गडचिरोली जिल्ह्यात माहिती संकलित करण्याचे काम सुरू झाले असून रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत यासंदर्भात देण्यात आल्या. महामार्गाच्या कडेला असलेल्या बेकायदा ढाब्यांवर व हॉटेल्सवर होणारी वाहनांची पार्किंग आणि गर्दीमुळे अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अनेक ठिकाणी वाहने रस्त्यावरच उभी केली जात असल्याने वाहतूक कोंडीची मोठी समस्या निर्माण होत आहे.

### सुप्रीम कोर्टाचे निर्देश, राज्य शासनाची कार्यवाही



सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार माहिती संकलित केली जात आहे. रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत यावर चर्चा करण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयाने महामार्गावरील सुरक्षेची गंभीर दखल घेत बेकायदा अतिक्रमणे हटवण्याचे कडक निर्देश दिले आहेत. या आदेशानंतर राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना तातडीने सर्वेक्षणाचे काम हाती घेऊन धडक कारवाई करण्याचे निर्देश जारी केले आहेत.

### काय म्हटले आहे निर्देशात

वाहतूक सुरळीत राहण्यासाठी आणि अपघात टाळण्यासाठी रस्ता हद्दीतील सर्व अडथळे दूर करण्यात यावेत. नियमभंग करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जावी. महामार्गालगत कोणत्याही कायदेशीर बांधकामासाठी राष्ट्रीय किंवा राज्य महामार्ग प्राधिकरणाची पूर्वमंजुरी घेणे आता बंधनकारक केले आहे.

**ढाबे, हॉटेल, व्यावसायिक बांधकामाला बंदी**

न्यायालयाच्या निर्देशानुसार आता महामार्गाच्या हद्दीत कोणत्याही नवीन ढाब्याला, हॉटेलला किंवा व्यावसायिक बांधकामाला पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. आदेशाची अंमलबजावणी आणि सततच्या देखरेखीत सुसूत्रता राहावी यासाठी प्रत्येक जिल्ह्यात विशेष 'महामार्ग सुरक्षा कृतीदल' स्थापन केले जाणार आहे. त्या अनुषंगाने कार्यवाही होणार आहे.


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ अमरावती विदर्भ महाराष्ट्र देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वाढला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :